क: वस्तू व सेवाकर विभाग/विसर्जित पदांबाबत/पुनर्रचना कक्ष/प्र.क्र. ९७/ब-७९७-मुंबई दि 19 AUG 2024

## कार्यालयीन आदेश

विषय: विभागातील पुनर्रचनेच्या अनुषंगाने प्रलंबित कामाचे सुयोग्य, जलद व विहित समयमर्यादेत निपटारा करणेबाबत.

संदर्भ: १. वस्तू व सेवाकर विभागाचा सुधारित आकृतीबंध निश्चित करणेबाबतचा शासन निर्णय दि.१५.०३.२०२४.

२. पुनर्रचना/ सुधारित आकृतीबंध निश्चित करणेबाबतचे कार्यालयीन आदेश क्र.७०५, दि.२३.०७.२०२४.

३. जुने व नवीन पदनाम व सांकेतांक सुनिश्चित करणेबाबतचे आदेश क्र.७४७, दि. ०५.०८.२०२४.

संदर्भाधिन शासन निर्णयानुसार दि. १५.०३.२०२४ मधील परिच्छेद क्र.२ अनुसार मंजूर पदांच्या मर्यादेत उपलब्ध पदांचे अंतर्गत समायोजन, आवश्यक कार्याचे नियोजन, वितरण व फेरबदल इ. अधिकार राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना प्रदान करण्यात आले आहेत. प्रस्तूत अधिकारांचा वापर करत, राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि. ०५.०८.२०२४ रोजी राज्यकर विभागाच्या पुनर्रचनेबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

संदर्भाधिन क्र.३ च्या आदेशानुसार जुन्या नोडल विभागातून पुनर्रचित नोडल विभागात उपलब्ध होणारी पदे परिशिष्ट-अ मध्ये व विसर्जित पदे परिशिष्ट-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आली होती. विसर्जित पदांकरीता नवीन महाविकास सांकेतांक न देता त्या कार्यभारातील कर प्रकरणांचे पूर्व नियोजन करण्याचे अधिकार त्या आदेशाच्या परिशिष्ट - ब मधील शेवटच्या रकान्यातील मधील नमूद विभागीय राज्यकर सहआयुक्तांना देण्यात आले आहेत.

सदर परिशिष्ट - ब मधील रकाना ५ मध्ये नमूद पुनर्रचनापूर्वीचे पदांचे महाविकास सांकेतांक विसर्जित होवून, त्या त्या विसर्जित पदावरील अधिकाऱ्यास

पुढील पदस्थापना देण्यात येणार आहेत. सदर विसर्जित पदांच्या कार्यभारात काही कालबाह्य होणाऱ्या बाबी असून त्याबाबत नियोजन करणे आवश्यक आहे.

सबब, राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना संदर्भाधिन क्र. १ च्या शासन निर्णयामुळे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार दि. ०५.०८.२०२४ च्या कार्यालयीन आदेशात नमूद केल्याप्रमाणे समय मर्यादेत निपटारा करावयाची प्रलंबित कामासाठी ज्या ज्या पदांना विसर्जित करण्यात आलेले आहे व जी पदे परिशिष्ट- ब मध्ये ज्या राज्यकर सहआयुक्तांच्या सांकेतांकापुढे नमूद करण्यात आली आहेत, त्या त्या राज्यकर सहआयुक्तांकडे त्या त्या विसर्जित पदांवरील त्यावेळी उपलब्ध अधिकाऱ्यांच्या सेवा ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत, अथवा पुढील आदेशांपर्यत (यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत) उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

संबंधित राज्यकर सहआयुक्त यांनी सदर अधिकाऱ्यांना कालबाह्य होणाऱ्या अथवा तातडीच्या प्रलंबित कामाचे सुयोग्य व जलद निपटारा करण्यासाठी स्थानिक पातळीवर आवश्यकतेनुसार सेवा उपलब्ध झालेल्या अधिकाऱ्यांच्या सेवा वापरुन प्रलंबित असलेली प्रकरणे दि. ३१.०८.२०२४ पर्यंत निपटारा होतील याची दक्षता घ्यावी. तसेच कुठलेही प्रकरण कालबाह्य होणार नाही, याची खबरदारी घ्यावी.

**(मा. राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मान्यतेने)**

**विशेष राज्यकर आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

प्रत सादर:

१. सर्व अपर राज्यकर आयुक्त.

२. सर्व राज्यकर सहआयुक्त.

३. राज्यकर आयुक्तांचे विशेष कार्य अधिकारी.